


"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार" - शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित

संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, तासगाव.

# स्नेहकुंज वार्तापत्र

संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन



संपादक : डॉ. बी. एम. पाटील | कार्यकारी संपादक : डॉ. एम. एस. उभाळे | अंक - १ वा | वर्ष - १ ले | २२ ऑक्टोबर २०२१




## संपादकीय

**प्र. प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील**

मागील आठवड्यात २० ऑक्टोबर पासून महाविद्यालये सुरु होणार अशी बातमी माध्यमाव्दारे प्रसारित झाली. बातमी ऐकल्यावर अत्यानंद झाला. कोविड १९ मुळे प्रत्येक क्षेत्रात कमीअधिक प्रमाणात नुकसान झाल्याचे अनुभवास आले. थोडे मागे वळून पाहिल्यास असे लक्षात आले की, शिक्षणक्षेत्रात मोठया प्रमाणात झाले, त्यातल्या त्यात बी.एड., महाविद्यालयाचे सर्वांत जास्त नुकसान झाले. याचे एकमेव कारण म्हणजे बी. एड. महाविद्यालयात प्रशिक्षण काळात प्रात्यक्षिक कार्यावर भर जास्त असतो. तोच अनुभव त्यांना ऑनलाईन व्दारे घ्यावा लागला. १८ महिन्या नंतर महाविद्यालय सुरु होणार आहे. दीर्घ विश्रांतीनंतर प्राचार्य, शिक्षक व विद्यार्थी नवी आव्हाने आणि उमेद घेऊन प्रगतीचा आलेख तयार करतील अशी अपेक्षा वाटू लागली आहे. या अपेक्षांची वाटचाल दिशा, वेग आणि गती योग्य असेल तरच आपले शैक्षणिक उद्दीष्ट साध्य होईल. प्रशिक्षणार्थीनीच्या मनात शैक्षणिक चैतन्य, उत्साहपूर्ण वातावरणाची निर्मिती होण्यासाठी २२ ऑक्टोबर २०२१ ला संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांच्या ८ व्या स्मृतीदिना निमित्त स्नेहकुंज वार्तापत्र प्रकाशित करताना अत्यानंद होत आहे..

स्नेहकुंज वार्तापत्र सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयात घेतलेले कार्यक्रम, स्पर्धा, विविध उपक्रम, प्रकल्प, पारितोषिक, पुरस्कार, प्रात्यक्षिक कार्य, तसेच विद्यार्थी, शिक्षकांनी मिळवलले शैक्षणिक यश मिळविले आहे. महाविद्यालयाच्या कार्याचे प्रतिबिंब सदर वार्तापत्रकात उमटलेले आहे.

महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील यांना जागतिक शिक्षक दिनादिवशी रोटरी क्लब, कोल्हापूर व्दारे नेशन बिल्डर पुरस्कार मिळाला आहे. या पुरस्कारामुळे महाविद्यालय, व संस्थेच्या नावलौकिकाकात भर पडली आहे.

महाविद्यालयातील दुसरी एक चांगली घटना म्हणजे शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागातून गुणवत्ता यादीत कु. प्राजक्ता जगन्नाथ पाटील हिने ९ वा क्रमांक पटकविला आहे. तसेच महाविद्यालयाने १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे.

महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थीनी विविध स्पर्धेत भाग घेत असतात. या शैक्षणिक वर्षात यशवंतराव चव्हाण राजयस्तरीय निबंध स्पर्धेत कु. मयुरी रविंद्रनाथ शेंडगे हिला दुसऱ्या क्रमांकाचे ४०००/- रुपयांचे बक्षिस मिळाले आहे.

ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार हे व्रत विधान घेऊन शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी ज्ञानगंगा घरोघरी पोहचविण्यासाठी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना सन १९५४ साली केली. सध्या संस्थेची संस्कृतिक केंद्रे ४०६ आहेत. संस्थेत अध्यापक विद्यालये व महाविद्यालये एकूण ११ आहेत. यामधील संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे महिला शिक्षणाशास्त्र महाविद्यालय, तासगांव येथे १९८४ पासून कार्यरत आहे.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्षसो मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे साहेब व संस्थेच्या सचिव मा. प्राचार्य सौ. शुभांगी गावडे यांच्या वेळोवेळी मार्गदर्शनामुळे महाविद्यालयाचे शैक्षणिक कामकाज व्यवस्थित चालू आहे. निमशहरी भागात सदर महाविद्यालयाचे शैक्षणिक कार्य उत्कृष्टपणे चालू आहे. महाविद्यालयाच्या स्थापनेमुळे अनेक विद्यार्थीनींना शिक्षणशास्त्रातील पदवी मिळवून शिक्षकी पेशाचे पवित्र कार्य करण्याची संधी मिळाली आणि समाजात मानसन्मान ही मिळाला. महाविद्यालयाच्या अनेक प्रशिक्षणार्थीनी शासकीय प्रशासकीय सेवेत सुध्दा कार्यरत आहेत.

शिवाजी विद्यापीठात महाविद्यालयाने गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेत शिक्षणशास्त्र योजनेतून निमशहरी विभागातून प्रथम क्रमांक मिळविला आहे. महाविद्यालयाचे पहिल्या फेरीतील नॅक मूल्यांकनातील मानांकन (सी +++) असे प्राप्त झाले होते तसेच दुस-या वेळी नॅक बी ग्रेड (२.४४) असे मानांकन दर्जात प्रगती झालेली दिसून येते. नॅक तिस-या फेरीसाठी जून २०२१ मध्ये नॅक मूल्यांकनासाठी नोंदणी केली आहे. तिस-या नॅक मूल्याकँनासाठी अ मानांकन मिळण्यासाठी महाविद्यालय प्रयत्न करीत आहे.

महाविद्यालयाचा सर्वांग सुंदर विकास होण्यासाठी सन २०१९ पासून नवीन इमारतीचे बांधकाम चालू केले आहे. सदर बांधकाम जमिनीलगतचा व पहिला मजला मिळून ६००० स्के. फुट एवढे क्षेत्रफळ आहे. एनसीटीईच्या मानांकना प्रमाणे महाविद्यालयाची नूतन इमारत २०२०-२०२१ पूर्णत्वास येत असल्याने भौतिक सुविधेच्या दृष्टीने महाविद्यालय संपन्न होत आहे.

महाविद्यालयात प्रशिक्षणार्थीनींचा गुणात्मक, भावात्मक आणि क्रियात्मक क्षेत्रांचा व्यक्तिमत्त्व विकास होण्यासाठी अनेक उपक्रम घेतले जातात. शैक्षणिक, सामाजिक, वैद्यकीय, पर्यावरण विषयक, क्रीडा महोत्सव, तसेच प्रात्यक्षिक कार्याला अनुसरुन उपक्रम, प्रकल्प, विषयाची मंडळे वर्षभर नियोजन व त्याची अंमलबजावणी केली जाते.

प्रशिक्षणार्थीनी विविध कौशल्यात पारंगत होण्यासाठी महाविद्यालयात, अद्ययावत संगणक कक्ष, शैक्षणिक तंत्रविज्ञान कक्ष, विज्ञान प्रयोगशाळा, शैक्षणिक मानसशास्त्र कक्ष, समृध्द ग्रंथालय, परीक्षा विभाग, शारीरिक शिक्षण विभाग, सेमिनार हॉल, विद्यार्थीनी कक्ष, आर्ट व ड्रामा विभाग, योगा अभ्यासासाठी स्वतंत्र सुविधा, अद्ययावत स्वच्छतागृह तयार करण्याचे कार्य चालू आहे. महाविद्यालयात महिलांच्या दृष्टीने सुरक्षित दैनंदिन परिपाठ व प्रार्थनेचे खुले क्रीडांगण करण्यात आले आहे. सदर ठिकाणचा सांस्कृतिक कार्यक्रमासाठी सुध्दा उपयोगी होणार आहे.

महाविद्यालयाचा निकाल अपवाद वगळता प्रत्येक वर्षी १०० टक्के लागतो. प्राध्यापकांचे मार्गदर्शन वेळोवेळी लाभते. महाविद्यालयात या शैक्षणिक वर्षात डॉ. उभाळे एम. एस. व डॉ. सौ. भंडारे एल. व्ही. यांची शिक्षण क्षेत्रातील उच्य पदवी म्हणजे पीएच. डी.

## स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचा स्नेहकुंज - संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे



-प्रा. जी. के. पाटील तासगाव

शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे म्हणजे पंढरीच्या विठ्ठलाने महाराष्ट्राच्या विकासाला ज्ञानगंगेच्या माध्यमातून दिलेला महाप्रसाद होय. आई वडिलांच्या अकाली निधनाने आयुष्याला आलेली दुःखाची ललाटरेषा, पोटाची भूक भागवण्यासाठी वार लावून जेवायला लागलेली अवस्था, मनाला खिन्न करून टाकणारी होती. आणि परमेश्वरावर द्वेषारोपाचा अभिषेक घालायला लावणारी होती. याही अवस्थेत विठ्ठलाची भक्ती सोडली नाही आणि घरातील देवपूजेला बगल दिली नाही. त्यामुळे ईश्वराने त्यांच्या अंगी चैतन्याचा अंगार फुलवला होता. ज्ञानाच्या भुकेपेक्षा पोटाची भुक त्यांना कधीच मोठी वाटली नाही. समाजदुःखापेक्षा स्वदुःख कधीच मोठे न वाटल्याने विद्यार्थिदशेत प्रतिकुलतेतही इस्लामपूरला श्री राम शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना करून १५ प्राथमिक शाळा काढल्या. हा समाजाला बापूजींच्या कर्तृत्वाचा दिसलेला अंधुकसा प्रकाशाचा कवडसा जाणवुन देऊ लागला. उद्याच्या महाराष्ट्राच्या शिक्षण क्रांतीचा भगीरथ सातारच्या क्रांतिकारी भूमीत वाढतोय आणि महाराष्ट्राला खुणावतेय. जरा थांबा ! मला अगोदर स्वातंत्र्य मिळवू दे ! स्वराज्याचे सुराज्य तुम्हास किती प्रकाशमान करू शकते याचा दृष्टांत दिल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही.

१९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यातील या क्रांती पुत्राने १९५४ साली ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार या ध्येयवादाला अंगीकृत करीत संस्था आणि समाज सशक्त व्हावा, यासाठी सत्य, चारित्र्य, प्रामाणिकपणा, त्याग व सेवा या खडतर तत्वाचा अंगीकार करून १९५४ पासून महाराष्ट्राच्या दऱ्याखोर्यात श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची संस्कृतिक केंद्रे वाड्या-वस्त्या वरती ज्ञानाची पहाट फुलवू लागले. समाज ज्ञानसुगंधित होऊ लागला आणि बापूजींच्या भोवती मोठ्या भाविकतेने जमा होऊ लागला. बापूजींच्यातली ही शक्ती समाजशक्ती आहे आणि त्यावर ती आपली भक्ती तेजःपुंजाची असली पाहिजे या दृष्टीने संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांनी साथ दिली आणि बापूजींच्या शिक्षण कार्याला साद घातली. आपण आपल्या महाराष्ट्राच्या भाग्यविधात्याची आपण पत्नी होत हाच संसाराचा खरा दागिना आहे. त्यामुळे सुशीलादेवी मणी मंगळसूत्रा व्यतिरिक्त कधीही दागिन्यांचा हव्यास धरला नाही. त्यांनी पतीचे कार्य आपल्या जगण्याचा ध्येयवाद मानला आणि त्या बापूजीमय, संस्थामय झाल्या.

वसतिगृहातील मुलांना त्यांनी आपली मुले मानली. दीपावली आंघोळ आणि 'राळ देणारी ही माऊली अनाथ मुलांना आपली आई वाटली आणि ती मुलं आईकडे हट्ट धरावा त्याप्रमाणे सुनीतादेवींच्या कडे हट्ट धरु लागली आणि सुशीलादेवी बालहट्ट पुरवू लागल्या. मुलांना आपण भरवलेला मायेचा घास घालावा म्हणून अध्यात्मातल्या कथा सांगून त्यांच्या ज्ञानाची आस आणि बापूजी प्रती निष्ठा वाढवीत राहिली. हीच मुले पुढे स्वामी विवेकानंद संस्थेची सारथी झाली. त्यामुळे बापूजींचे आणि संस्थामातेचे स्वप्न साकार झाले.

साळुंखे परिवारातल्या त्यागाचा जन्म संस्थामाता सुशीलादेवीच्या त्यागाच्या पदराखाली झाला आहे. त्या बापूजींच्या पाऊलवाटेने सीमित गरजा ठेवून संसार सारथी झाल्या. दुःखाने, अपेक्षेने त्यांच्याभोवती कधी 'र धरला नाही. तरी आकांक्षा मात्र कायम होती. पतीच्या प्रत्येक कार्याच्या चिर्यात माझा विश्वास असायला हवा. त्यामुळे शिक्षण प्रसार करताना बापूजी अनेक कार्यकर्ते सोबत कधी रात्री-अपरात्री घरी आले तर ही माऊली कोंड्याचा मांडा करून पोटभर जेवायला घालत असे. वात्सल्य काय असते हे नव्या पिढीने संस्थामातेच्या आदर्श जगण्याच्या पद्धतीतून शिकावे. दुःख ओठावरती आले नाही आणि कपाळावरती कधी दुसऱ्याच्या द्वेशाची कधीही अढी पडले नाही. म्हणून स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था आज सदाबहार बहरलेली दिसते.

बापूजींच्या विचारधारेत प्रवाहित झालेल्या या माऊलीने बापूजी रूकडी येथे असताना स्वसंसार सुरू केला. कधी सोंडूर संस्थानात वास्तव्य तर कधी सातारा आणि संस्था स्थापनेनंतर कोल्हापूर येथे कायमस्वरूपी निवास झाला. या काळात आपल्या मुलांनाही त्यांनी खूप काही जगण्याचे आदर्श शिकवले. त्यामुळे आज आपणाला प्राचार्य अभयकुमार साहेबांचा संस्था प्रेमाचा छत्र सुखावतो आणि खुणावतोय तुम्ही बापुजींचा आणि संस्थामातेचा ध्येयवाद आचरण केला तर जगण्यात दुःखाला फारशी संधी येणार नाही. या मातेने प्राचार्य अभयकुमार साहेबांच्या सारखा शिक्षणमहर्षी बापूजींच्या त्यागी, परमार्थी विचारधारेचा पुत्र आपणाला दिला. म्हणूनच आज स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था महाराष्ट्रातील बहुजनांना आपली वाटते. हे यश बापूजींच्या, संस्थामातेच्या, अभयकुमार साहेबांच्या त्यागी पायवाटेचे आहे. स्वामी विवेकानंद संस्थेचा स्नेहकुंज म्हणजे संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे. अशा एका कर्तृत्वशाली महाराष्ट्राच्या दुसऱ्या सावित्रीबाई फुले म्हणून अभिमान वाटावा इतकी माया बहुजनांना देणाऱ्या, बापूजींच्या विचारांची साखरपेरणी करणाऱ्या, संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांना त्यांच्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन करताना त्यांच्याच कर्तृत्वाने माझ्या हाती आलेली ही शब्दफुलांची ओंजळ अर्पण करतो.



## संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांच्या कार्याचा मागोवा..

**- डॉ. ए. टी. पाटील**

बेळगावचे सुप्रतिष्ठित शेतकरी दत्ताजीराव ऊर्फ नानासाहेब चव्हाण पाटील यांच्या सर्वात लहान सुकन्या म्हणजे सुशीलादेवी. यांचा जन्म ४ सप्टेंबर १९२७ रोजी बेळगाव येथे झाला. शालेय शिक्षण बेळगाव येथील महानगरपालिकेच्या शाळेत झाले. त्यावेळच्या प्रथेनुसार सातवीनंतर त्यांचे शिक्षण बंद झाले. बालवयापासूनच सेवाभाव, जिव्हाळा, सात्विकता, कामाचा उरक, व्यवहारचातुर्य आणि नीटनेटकेपणा हे गुण त्यांच्यामध्ये रुजलेले होते. बापूजींचे ज्येष्ठ बंधू परशुरामभाऊ यांनी लग्नासाठी बापूजींना सुशीलादेवी यांचे स्थळ सुचविले आणि १५ डिसेंबर १९४० रोजी बेळगावच्या माळ हनुमान मंदिरात बापूजींचा आणि सुशीलादेवी यांचा विवाह संपन्न झाला.

सत्यशोधक विचारांच्या बापूजींनी हा विवाह अत्यंत साध्या पद्धतीने घडवून आणला. लग्नानंतर काही काळ डॉ. अप्पासाहेब पवार यांनी बापूजींवर सोंडूरच्या इतिहास संशोधनाची जबाबदारी सोपवली. सोंडूर संस्थानांमध्ये संस्थानचे राजे यशवंतराव घोरपडे यांनी राजपुत्राचे राजगुरू होण्याची विनंती केली. येथूनच त्यांना परदेशी जाण्याची संधी निर्माण झाली, परंतु बापूजींच्या जीवनावर महात्मा गांधी यांच्या विचाराचा प्रभाव पडलेला होता. देश पारतंत्र्यात जखडलेला असताना आपण पाश्चात्य देशांमध्ये जाऊन बसावे हे त्यांना मनोमन पटत नव्हते. संस्थानचे राजे यशवंतराव घोरपडे महाराज यांना नम्रपणे परदेशी जाण्यास नकार दिला. पुढे १९४२ च्या

पान नं. ३ वर

# शिक्षणक्षेत्रातील रचनात्मक दीपस्तंभ : मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे



**डॉ. पाटील बी. एम.**
प्रभारी प्राचार्य,
संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे
महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
तासगांव जि. सांगली

मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीवर बापूजींचा व श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचा प्रभाव पडलेला दिसून येतो. बापूजींच्या कार्याचा मागोवा घेतल्याशिवाय हा लेख पूर्ण होवू शकत नाही. अभयकुमार साळुंखे यांचे वडिल गोविंद ज्ञानोबा साळुंखे म्हणजेच बापूजी यांचा जन्म ९ जून१९१९ साली सातारा जिल्हयातील पाटण तालुक्यातील रामापूर या गावात झाला. बापूजी सर्वसाधारणे एक वर्षाचे असताना त्यांचे मातृछत्र हरपले आणि प्राथमिक शाळेत इयत्ता ७ वीला असताना त्यांचे पितृछत्रही हरपल्यामुळे त्यांच्या जीवनाची सुरूवात खडतर झाली. पोरक्या झालेल्या बापूजींना इस्लामपूरच्या राम मंदिरात रहावे लागले. प्रभू रामचंद्रांच्या त्यागाचा संस्कार घेत बापूजींनी प्रसंगी वार लावून, उपाशीपोटी राहून आपले माध्यमिक शिक्षण पूण केले. शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरु डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या छत्रछायेखाली त्यांनी महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले.

प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगमधील बापूजींचे परममित्र श्री. आर. डी. पाटील यांनी सर्वप्रथम गोविंदाला बापूजी या नावाने संबोधले तेव्हा पासून शैक्षणिक क्षेत्रात, लोकमाणसात आणि संस्थेच्या गुरूदेव कार्यकर्त्यांमध्ये बापूजी हे नाव रूढ झाल्याचे दिसून येते. पुढे डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या आज्ञनेनुसार सोंडूर संस्थानाचा इतिहास लिहिण्यासाठी व राजगुरू म्हणून कार्य करताना त्यांनी १९४२ च्या स्वातंत्र्य संग्रामात व भूदान चळवळीत सहभाग, तदनंतर कर्मवीर आण्णांच्या रयत शिक्षण संस्थेत शिक्षक व मुख्याध्यापक म्हणून रूकडी येथे त्यांनी भरीव कार्य केले. रयत शिक्षण संस्थेच्या सेवाकार्यातून मुक्त होऊन त्यांनी आपल्या उदात्त हेतूने नव्या जीवित कार्याचे नवे पर्व सुरू केले. आपली नवीन संस्था काढण्यासाठी मित्रांच्या सोबत दि. १९ आक्टोबर १९५४ साली कराड येथे कृष्णा नदीच्या काठावर मुरलीधरांच्या मंदिरात संस्था स्थापनेचा मनोदय निश्चिय केला. त्यानंतर तासगाव तालुक्यातील तुरची गावातील बैठकीमध्ये स्वामी रामानंद भारती यांनी संस्थेचे नाव श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था असे देऊन शुभ आशिर्वाद दिला. बापूजींच्या आदर्श जीवनाचे व सुसंस्कृत मनाचे प्रतिबिंब संस्थेच्या ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार या ब्रीद वाक्यात दिसून येते. या ब्रीद वाक्याची पूर्तता करण्याची सुरूवात दि. ०६ जून १९५५ या तारखेला कोल्हापूर, तासगाव, चाफळ, तारळे, उंडाळे या पाच माध्यमिक शाळा व कराड येथे महिला अध्यापक विद्यालय तसेच कोल्हापूर व चाफळ येथे वसतीगृह अशी संस्कृतिक केंद्रे उदयास आली. यानंतर संस्थेची महाराष्ट्रातील १३ जिल्हयात संस्थेची ४०६ संस्कृतिक केंद्रे शिक्षण प्रसाराचे काम करीत आहेत. या सर्व संस्कृतिक केंद्रात बापूजींची स्वरचित प्रार्थना दैनंदिन परिपाठात मनोभावे गायली जाते. संस्थेची संस्कृतिक केंद्रे ही दूर, दूर्गम, डोंगराळ, उपेक्षित खेडयापाडयातून, आदिवासी, कोकण, मराठवाडा याविभागात बहुजन समाजाला ज्ञान गंगा घरोघरी या वाक्याची परिपूर्ती करतात. बापूजींच्या जीवनाचा सार चार शब्दात मर्यादित करणे अवघड असले तरी मा. कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे या सर्व घटनाक्रमाचे प्रत्यक्ष साक्षीदार असल्याने त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर बापूजीचे चांगले संस्कार झाले आहेत.

महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात अभयकुमार साळुंखे यांनी स्वत:ची अशी खास ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या आतापर्यंतच्या जीवनप्रवासाचा अभ्यास केल्यास ज्यांना शिक्षणक्षेत्रात पाऊल ठेवावयाचे आहे त्यांना प्रेरणादायी ठरणार आहे. त्यांचा कौटुंबिक पार्श्वभूमीचा अभ्यास करताना त्यांचे वडिल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संकल्पक, संस्थापक व कार्याध्यक्ष शिक्षणमहर्षी परपूज्य गोविंद ज्ञानोजीराव साळुंखे म्हणजेच बापूजी साळुंखे व मातोश्री संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे आहेत. अभयकुमार साळुंखे यांना तीन बहिणी व दोन भाऊ असा यांचा गोतावळा होता. सगळयात थोरले चिरंजीव म्हणून अअभयकुमार साळुंखे असल्याने सर्वांचे प्रेम त्यांना मिळाले. अभयकुमार साळुंखे यांचा जन्म १७ जानेवारी १९४४ साली बेळगावमधील होसूर येथे झाला. घरात त्यांना सर्व जण आवडीने बबन म्हणत. त्यांना आईचा सहवास जास्त लाभला याचे मुख्य कारण म्हणजे बापूजी सतत सामाजिक, शैक्षणिक प्रसाराच्या कार्यात कार्यमग्न असल्याने बाहेरच असावयाचे.

त्यांच्या शिक्षणाची सुरूवात ग्रामीण भागातील रूकडी गावातील प्राथमिक शाळेत झाली. त्यानंतर पद्माराजे हायस्कूल मध्ये प्रवेश घेतला. पुढे संस्थेने उघडलेल्या पहिल्या पाच संस्कार केंद्रापैकी कोल्हापूर येथील बुधवार पेठेतील श्री छत्रपती शाहू हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला. येथेच त्यांना शिस्तीचे धडे मिळाले. या शिस्तीमुळेच साहेबांच्या व्यक्तिमत्त्वाला पैलू पडत गेले. महाविद्यालयीन शिक्षणाची सुरूवात प्रथम राजाराम कॉलेज मध्ये झाली पुढे बापूजींच्या सांगण्यावरून त्यांनी सायन्स शाखेत प्रवेश घेतला परंतु त्यांचे सायन्स शाखेत मध्ये मन न लागल्याने त्यांनी बापूजींची पूर्वपरवानगी काढून आर्टस शाखेत नव्यानेच स्थापित झालेल्या विवेकानंद कॉलेज मध्ये प्रवेश घेवून बी.ए. चे शिक्षण पूर्ण केले. या शिक्षणाच्या कालावधीत दोन वेळा जनरल सेक्रेटरी झाल्याने त्यांना नेतृत्त्वाची संधी प्राप्त झाली. जनरल सेक्रेटरी पदावर असताना त्यांनी केलेल्या भाषणाचे मा. कुलगुरु आप्पासाहेब पवार यांनी तोंडभरून कौतुक केल्याने बापूजींना अत्यानंद झाला. या क्षणा पासून संस्थेच्या पदव्युत्तर शिक्षणासाठी शिवाजी विद्यापीठात प्रवेश घेऊन त्यांनी आपल्या आवडीच्या मराठी विषयातून एम. ए. पूर्ण केले. पदव्युत्तर शिक्षणाबरोबरच त्यांनी 'इच्छा माझी पुरी करा' व 'गुलाब बदाम राणी' इत्यादी नाटकांमधून आपल्या अभिनयाचे उत्तम सादरीकरण केले. मा. कुलगुरु आप्पासाहेब पवार यांनी त्यांचा अभिनय पाहून मा. अभयकुमार साळुंखे यांच्या पाठीवर शाब्बासकीची थाप दिली. कुलगुरुंच्या याच प्रेरणेमुळे मराठी विषयाचे आणि विद्यार्थी प्रिय प्राध्यापक म्हणून त्यांनी नावलौकिक मिळविला. एम. ए. चे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर संस्थेच्या राजे रामराव महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून रूजू होण्यापूर्वी बापूजींनी त्यांना दिलेला उपदेश लाखमोलाचा वाटतो. तो आहे तसा नमूद करू इच्छितो, संस्थेत आपण काम कसे करावे, आपली भूमिका काय असावी, 'प्रामाणिक सेवा आणि त्याग' या गोष्टींनी आपले आयुष्य कसे उन्नत बनवावे, विद्यार्थी आपले दैवत आहेत. पहिल्यांदा एक चांगला शिक्षक व्हा. आपल्या विषयाचा सखोल अभ्यास करा त्यामध्ये प्राविण्य मिळवा. विद्यार्थ्यांची मने जिंका, जिथे जाल तेथे मित्र जोडा, लोकांशी संवाद करा, समाजात मिसळा, लोकांच्या सुखदु:खाशी समरस व्हा. संस्थापकांचा मुलगा म्हणून कोणत्याही सवलतीची अपेक्षा करू नका असे जवळ घेऊन समजावून सांगितले. या तत्त्वज्ञानाच्या शिदोरीवर जत, कोल्हापूर, मिरज या ठिकाणी प्राध्यापकाची नुसती नोकरी न करता विद्यार्थीप्रिय प्राध्यापक म्हणून नावलौकिक मिळविला.

जून १९७० मध्ये एम.ए. ची पदवी संपादन केल्यानंतर संस्थेचे राजे राजाराम महाविद्यालय, जत येथे प्राध्यापक म्हणून शैक्षणिक अध्यापनाचे कार्य चालू केले. नोकरी मिळाल्यानंतर त्यांचे लग्न १५ मे १९७१ साली विवेकानंद महाविद्यालयाच्या पटागणांत संपन्न झाले. शैलजावहिनीचे शिक्षण एम.एस्सी. असल्याने त्यांनी प्राध्यापकाचे यशस्वी कार्य केल्यानंतर त्यांनी इचलकरंजी कन्या महाविद्यालयात प्राचार्य पदाची यशस्वी कार्यकिर्द पूर्ण केली. साहेबांच्या थोरल्या सुकन्या संस्थेच्या प्राचार्या सौ. शुंभागी गावडे या सध्या संस्थेच्या सेक्रेटरी पदावर यशस्वीरित्या कार्यरत आहेत. दुसरी कन्या श्रुती जोशी सध्या विवेकानंद महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापक म्हणून अध्यापनाचे कार्य करत आहेत. साहेबांच्या कुंटंबातील सर्वच सदस्य शिक्षण क्षेत्राची मनोभावे सेवा करीत असल्याचे सुंदर चित्र दिसून येते.

प्राध्यापक पदाच्या अनुभवानुसार त्यांनी प्राचार्य पदाची संस्थेच्या रितसर जाहिरातीनुसार दोनवेळा मुलाखती देवून सुध्दा त्यांची निवड झाली नाही परंतु तिसऱ्यावेळी आपली गुणवत्ता सिध्द केल्यानंतर सन १९७८ पासून मराठवाडयातील तुळजाभवानी महाविद्यालयाचा प्राचार्य पदाचा कार्यभार सक्षमपणे स्वीकारला. स्थानिक लोकांच्या आणि मित्रांच्या सहकार्याने या महाविलायाची शिस्तीची घडी चांगली बसविली त्यानंतर काकासाहेब चव्हाण महाविद्यालय, तळमावले येथे प्रशासकीय शिस्त, नाग टेकडीवरील हिरवाई निर्माण करण्यात त्यांनी मोलाचे योगदान दिले. प्राध्यापक व प्राचार्य म्हणून एकाच शाखेवर कार्य न करता संस्थेच्या विविध शाखांवर कार्य करून सर्व गुरूदेव कार्यकर्त्यांच्या समोर एक आदर्श ठेवला. याचा दुसरा फायदा म्हणजे प्रत्येक विभागात प्राध्यापक वर्ग, ग्रामस्थ, शिक्षण व संस्थाप्रेमी व्यक्तिचा जवळून परिचय झाला या सर्व लोकसमुहाचे आजपर्यंत साहेबांना संस्था कार्यात सहकार्य लाभत आहे.

संस्थेच्या विविध संस्कृतिक केंद्रातून प्राध्यापक व प्राचार्य म्हणून यशस्वी कार्य केल्यानंतर सन १९८५ साली संस्थेच्या अडचणीच्या काळात म्हणजे शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे हे आजारी अवस्थेत असताना सेक्रेटरी पदाची जबाबदारी त्यांना स्विकारावी लागली. आजीव सेवक समिती हा संस्थेचा मुख्य कणा आहे. संस्था चांगली चालवायाची असेल तर त्यागी, निस्पृह, कर्तबगार आणि प्रामाणिक माणसांची गरज असते. निष्ठावंत कार्यकर्तेच संस्था चालवू शकतात या तत्त्वज्ञानावर विश्वास असल्यामुळेच सचिव पदाच्या निवडी नंतर संस्थेतील आजी–माजी आजीव सेवक, व्यवस्थापक मंडळातील सदस्य, सर्व गुरूदेव कार्यकर्ते, संस्थेचे हितचिंतक, शिक्षण तज्ञ, शिक्षण प्रेमी, शाखा परिसरातील समस्त नागरिक, राजकीय, सामाजिक, नामवंत व्यक्तींच्या मध्ये संस्थेबद्दल आदरभाव निर्माण करण्याचे कठिण कार्य त्यांनी हाती घेतले ते यशस्वी करून दाखविले. सेक्रेटरी पदाच्या १८ वर्षाच्या काळात त्यांनी संस्थेच्या शाखांचा विस्तार वाढविण्याचा प्रयत्न केला याचे उत्तम उदाहरण म्हणजे १९८५ साली ३३० संस्कृतिक केंद्रे वरून सध्याच्या ४०६ संस्कृतिक केंद्रे १३ जिल्हयात विद्याज्ञानाचे महान कार्य करत आहेत. यामध्ये नाविण्यपूर्ण गोष्ट म्हणजे संस्थेने व्यावसायिक दृष्टिकोन निर्माण केल्याने संस्थेची इंजिअरिंग कॉलेज, हॉटेल मॅनेजमेंट, औषधनिर्माण शास्त्र, नर्सिंग कॉलेज, इत्यादी पदविका व पदवीचे शिक्षण सुरू केले आहे.

संस्थेचे विद्यार्थी, प्राध्यापक, प्राचार्य, कार्याध्यक्ष अशी महत्त्वाची पद भूषविण्याचा मान त्यांना प्राप्त झाला. या महत्त्वाच्या पदा सोबतच जबाबदारी सुध्दा त्यांनी त्याच ताकदीने स्विकारलेली दिसून येते. सन २००३ पासून अभयकुमार साळुखे कार्याध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. सन २०२० मध्ये त्यांनी वयाच्या ७५ व्या वर्षात पदार्पण केले आहे. अजून ही काम करण्याचा उत्साह कायम निर्झरासारखा वाहताना सतत दिसून येतो. संस्थेच्या कोणत्याही शाखेची माहिती त्यांना सखोल आहे. एखाद्या शाखेची निर्माण झालेली शैक्षणिक समस्या कशी सोडवावी याचा अनुभव पाठिशी असल्याने शाखा प्रमुखांना कार्य करताना कधीच भय वाटत नाही.

संस्थेतील गुरुदेव कार्यकर्त्यांच्या मनामध्ये साहेबांबद्दल एक आदरयुक्त भिती असल्याने साहेबांनी व्यक्त केलेल्या अपेक्षा व सांगितलेली कामे हे सर्व गुरुदेव कार्यकर्ते जबाबदारीने पार पाडतात. व्यक्तिगत पातळीवरसुध्दा प्रत्येक गुरुदेव कार्यकर्त्याला खात्री असते की, आपण साहेबाना भेटलो व आपली वस्तु:स्थिती सांगितली तर आपल्या संस्कृतिकेंद्राच्या समस्या साहेब सोडवितात हा विश्वास निर्माण करण्याचे कार्य साहेबांनी केले आहे. याचे मुख्य कारण म्हणजेच संस्थाच आपले कुंटुंब मानले आहे. त्यांची माया आणि मार्गदर्शन नेहमीच सर्व गुरुदेव कार्यकर्त्यांना लाभते हेच गुरुदेव कार्यकर्त्यांचे भाग्य आहे. गुरूदेवकार्यकर्त्यांची अचूक पारख करून त्यांच्या गुणांचा आणि शिक्षणाचा लाभ संस्थेच्या प्रगतीला मिळवून दिला. यामधून असे जाणवते की शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे यांचे महानिर्वाण झाल्यानेतर संस्थेतील सर्व गुरुदेव कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांनी अभयकुमार साळुंखे यांच्यावर विश्वास दाखविला त्याचप्रमाणे साहेबांनी तो सार्थ करुन दाखविला. संस्थेचे प्रशासक म्हणून कार्यकरताना कुंटुंब प्रमुखाची भूमिका ते बजावत आहेत.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्य करताना छत्रपती शिवाजी महाराज, श्री स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी, राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर आण्णा, डॉ. आप्पासाहेब पवार, धनंजय कीर, शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे ही कार्याध्यक्षांची श्रध्दास्थाने आहेत. या सर्वाच्या प्रेरणेतून, शुभाशिर्वादातून साहेबांना संस्थेची प्रगती करण्यास प्रेरणा मिळते. बापूजींनी असे सांगितले आहे की, निर्भय बाण्याचा आणि ताठ कण्याचा शिक्षक मला हवा आहे. निर्भय शिक्षक निर्भय पिढी निर्माण करू शकतो. निर्भय शिक्षकच विवेकाचा गजर करू शकतो. विवेकवाद लोकशाहीचा पाया आहे. या तत्त्वज्ञानाचा पाठपुरावा सातत्त्याने साहेब करताना दिसतात.

थोडक्यात, लेखाचा आढावा घेतल्यानंतर असे लक्षात येते की, साहेबांच्या व्यक्तिमत्त्वाची तयारी लहानपणापासून कौटुंबिक वातावरणातच झाली. संस्थेच्या स्थापनेपासून विद्यार्थी ते कार्याध्यक्ष पदापर्यंतचा प्रचंड अनुभव त्यांच्या पाठिशी असल्यानेच कोणात्याही कठिण प्रसंगातून विचार पूर्वक मार्ग काढतात. साहेबांच्या बाबत अनेक विचारवंतानी आपल्या लेखातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या अनेक पैलूवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला. हे सर्व साहेबांच्या शैक्षणिक आणि सामाजिक द्रष्टेपणाची साक्ष देतात. भविष्यकाळातील समस्या त्यांना कितीतरी आधी दिसते कारण त्यांच्या अभ्यासात आणि योजना प्रक्रियेत जशी संस्थेतील सामान्य गुरुदेवकार्यकर्ता, प्रशासकीय वर्ग, विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ ह्यांच्या परिस्थितीची जाण होती तशीच देशपातळीवर होत असलेले शैक्षणिक बदल समजावून घेऊन संस्थेच्या भविष्याचा आराखडा मांडण्याची त्यांची बौध्दिक आणि भावनिक शक्तीची मांडणी आदर्श होती. शिक्षणमहर्षी बापूजीचे विचार आणि शिक्षणाची ज्ञानगंगोत्री सर्वसामान्यांच्या घरोघरी पोहचविण्याच्या आनंदा बरोबरच त्यातील वेदनाही त्यांनी अनुभवलेल्या आहेत. वेदनाचे कधीही अवडंबर न करता त्यामधील आनंद गुरुदेव कार्यकर्त्यांना कसा मिळेल याचाच विचार त्यांनी सातत्याने केला. संस्थेची शैक्षणिक प्रगतीचा आलेख सातत्याने उंचाविण्यासाठी त्यांनी संस्था अंतर्गत विद्या समिती व परीक्षा विभागाची स्थापना केली. शिक्षणात येणारे नव विचार प्रवाह याला सामोरे जाण्यासाठी संस्थेतील गुरुदेव कार्यकर्ता सक्षम करण्यासाठी विद्या समिती मधील तज्ञाव्दारे मार्गदर्शनाचे कार्य सातत्याने चालू असते. याचे ताजे उदाहरण म्हणजे कोविड– या रोगाच्या प्रसारामुळे शाळा बंद झाल्या यावर उपाय म्हणजे सध्या ऑनलाईन अध्यापनाचे कार्य चालू आहे. यासाठी संस्थेतील सर्व गुरुदेव कार्यकर्त्यांना विद्या समितीव्दारे प्रशिक्षण दिले गेले यामुळे शाळा बंद न ठेवता शिक्षणाचे कार्य चालूच आहे. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे जिथे नवीनता आढळेल, अभिनव पर्याय आढळतील तिथे ते साह्य करतात आणि स्वत: देखील नावीन्याचा सतत शोध घेत असतात. त्यांना ही जाणीव होती की विविधता आणि नावीन्य ह्यामुळे कोणताही कार्यक्रम प्रकाशमान होतो यावर त्यांचा दृढ विश्वास आहे. संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक कार्य व लोकशिक्षणाची चळवळ त्यांनी उभी केली. याची नोंद सामाजिक संस्थेने घेवून त्यांच्या कार्याचा गौरव केला त्यामध्ये कोल्हापूर महानगरपालिकेने करवीर भूषण, समाजभूषण, जीवन गौरव यशवंत पुरस्कार देवून सन्मानित केले आहे. मा. अभयकुमार साळुंखेसाहेब २०२० या सालामध्ये अमृत महोत्सवी वर्षात पदापर्ण केले. संस्थेच्या गुरुदेव कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. त्यांच्या कडून शिक्षणाचा अखंड प्रवाह चालत रहावा यासाठी त्यांना शतायुष्य लाभो ही ईश्वर चरणी प्रार्थना करतो.


---

## संपादकीय पान नं. १ वरुन

त्यांना प्राप्त झाल्याने ९० टक्के स्टाफ पीएच. डी. धारक झाल्याने महाविद्यालयाचे मानांकन वाढविण्यासाठी संशोधनातील कार्य महत्त्वपूर्ण ठरत आहे. याचा लाभ प्रशिक्षणार्थीनींच्या संशोधन कार्यास होण्यास मदत होणार आहे.

या अंकात संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांच्या कार्यावर विशेष भर दिला आहे. मा. अभयकुमार साळुंखे यांच्या कार्यावर डॉ. बी. एम. पाटील यांनी चिंतनात्मक लेख लिहिला आहे. महाविद्यालयातील सांस्कृतिक कार्याचे संश्लेषण केले आहे. सन २०२०–२०२१ या शैक्षणिक वर्षातील स्नेहकुंज वार्तापत्र प्रकाशित करत आहोत. या अंकामध्ये प्रशिक्षणार्थीनींच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी विविध व्यक्तिलेख, कविता, वैज्ञानिक, भौगोलिक, ऐतिहासिक लेख मागवून घेतलेत त्यांच्या मधील चांगल्या लेखाची निवड करुन प्रकाशित केले आहेत.





## त्यागमूर्ती सुशीलादेवी साळुंखे

– प्रा. डॉ. एम. एस. उभाळे

प्रत्येकाच्या जीवनात आई हीच प्रथम गुरू असते. आईच्या सहवासातच प्रत्येकावर चांगले संस्कार होऊन जगण्यास ती व्यक्ती सक्षम होत असते. आईमुळेच सर्वांना मोठेपण प्राप्त होत असते. आई हीच प्रत्येकाच्या जीवनाचा पाया रचणारी त्यागमूर्ती असते. त्याचप्रमाणे श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्था स्थापन करणारे शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या पत्नी संस्थामाता सुशीलादेवी यांनी आयुष्यभर त्यांच्या सर्वच कार्याला मोलाची साथ दिली. त्यामुळेच आज या संस्थेचा प्रचंड विस्तार झालेला आहे. यामागे संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांचे दृढ पाठबळ आहे.

कधी–कधी आईची थोरवी सर्वांपुढे जाणीपूर्वक ठळकपणे सांगावी लागते. हे त्या पुत्राचे सद्भाग्य असते. आई कधी सरस्वती असते, तर कधी अन्नपूर्णा असते, तर कधी मायेने पाठीवर हात फिरवून आपल्या प्रेमाचा धबधबा अखंडपणे देणारी वात्सल्यमूर्ती असते. संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे या अन्नपूर्णा, सरस्वती आणि वात्सल्यमूर्ती तर होत्याच पण वसतिगृहातील मुलांचे लाड पुरवणार्या यशोदामाता होत्या. पुढे हीच मुले संस्थेचे शिलेदार झाले.

संस्थामाता सुशीलादेवी यांचा स्वभाव अत्यंत शांत, प्रसन्न आणि संयमी होता. स्वतःजवळ काही नसताना बापूजींच्या कार्यास भक्कम पाठिंबा देणाऱ्या, सुख–दुःखात साथ देणाऱ्या त्यागमूर्ती होत्या. म्हणूनच आज त्यांचे संपूर्ण जीवन नवीन पिढीला प्रेरणा देणारे आहे. मातेचा त्याग, महती सांगणारा व स्त्रियांना समानतेची वागणूक देणाऱ्या समाजाचा विकास होत असतो. संस्थामाता सुशीलादेवी यांचे कार्य समाजाला सातत्याने प्रेरणा देणारे असेच होते.

प्रत्येक माणसाच्या जीवनात सुख–दुःख येतात व जातात यातूनच माणसाला आपल्यावर आलेल्या संकटावर मात करण्याची शक्ती प्राप्त होत असते. हीच परिस्थिती त्या व्यक्तीला मोठेपण प्राप्त करून देत असते. त्यातूनच त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व समृद्ध होत जाते. संस्थामाता सुशीलादेवी यांच्या जीवनात अनेक संकटे आली पण त्या कधीच खचून गेल्या नाहीत. संघर्षातूनच त्यांचे व्यक्तिमत्त्व संपन्न होत गेले आणि हेच व्यक्तिमत्व आजच्या पिढीसाठी आदर्श ठरलेले आहे. डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जीवनात अनेक संकटे आली परंतु ते कधीही डगमगले नाहीत तर त्यांनी त्या संकटांवर यशस्वीपणे मात करून श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या माध्यमातून बहुजनांना शिक्षणाची संधी निर्माण केली. त्यामुळे सर्वच बहुजनांना या संस्थेविषयी कमालीची आस्था आणि आपुलकी आहे. समाज विकासामध्ये या संस्थेचा मोलाचा वाटा आहे. समाजव्यक्तिमत्व विकासाचे ध्येय साध्य करणारी ही संस्था आहे. आणि डॉ. बापूजींना भक्कम साथ देणारी संस्थामाता सुशीलादेवी यांनी स्वसुखाचा त्याग करून बहुजन समाजाच्या विकासासाठी अहोरात्र प्रयत्न केले. म्हणूनच त्या समाजसेवेचे व्रत घेतलेल्या त्यागमूर्ती आहेत.

आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांना अभिवादन करताना ही शब्दसुमनांची ओंजळ त्यांच्या चरणी अर्पण करतो आणि त्यांच्या संपूर्ण जीवन कार्याला शतशः नमन करतो.



## सं. सु. साळुंखे महिला महाविद्यालयात राज्यस्तरीय इंग्रजी ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा संपन्न

तासगाव : संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांच्या जयंतीनिमित्त संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय तासगाव येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व इंग्रजी भाषा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय इंग्रजी ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली. यात अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन आपले वक्तृत्व निपुण कौशल्याचे सादरीकरण केले.

यात कु. स्तुती महेश शिरोळ, होली फेथ हायस्कूल अंबरनाथ प्रथम क्रमांक. रामप्रसाद माळी, स्वामी रामानंद भारती विद्यामंदिर तासगाव द्वितीय क्रमांक, कु. पूर्वा चंद्रमणी सपकाळे, सेंट अलोयसेस कॉन्व्हेंट हायस्कूल, भुसावळ तृतीय क्रमांक, कु. अस्मिता साळुंखे व कु. श्रुती शशिकांत कांबळे उत्तेजनार्थ, ज्ञानोजीराव साळुंखे हायस्कूल पाटण यांना पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. प्र.प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील, नॅक समन्वयक व इंग्रजी विभागप्रमुख डॉ. अर्चना चिखलीकर तसेच प्रा. प्रभा घोरपडे, डॉ. ए. टी. पाटील, डॉ. लक्ष्मी भंडारे, डॉ. एम. एस. उभाळे, ग्रंथपाल श्री. ए. जी. पाटील व प्रशासकीय कर्मचारी श्री. एस. एस. महाडिक, श्री. एस. आर. कुंभार एच. टी. वाघमारे व श्री. एस. जी. कोठावळे यांनी मोलाचे सहकार्य केले.

## संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांच्या कार्याचा मागोवा

पान नं. १ वरुन

रणसंग्रामात सहभाग नोंदविला. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली बापूजी लढा देत होते. स्वातंत्र्य लढ्यामध्ये भूमिगत राहून भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी बापूजींनी योगदान दिले, तसेच कुटुंबाची जबाबदारी सांभाळतच सुशीलादेवी यांनी सुद्धा प्रपंच व्यवस्थितपणे केला.

सन १९४९ रोजी बापूजी रयत शिक्षण संस्थेमध्ये सातारा येथे शिक्षक म्हणून रुजू झाले. अण्णांच्यावर असलेली श्रद्धा आणि विद्यार्थ्यांना घडवण्याची जबाबदारी बापूजींनी स्वीकारली. साताऱ्यामध्ये सुशीलादेवी यांना कर्मवीर अण्णांच्या पत्नी सौ. लक्ष्मीबाई म्हणजेच वहिनींचा सहवास लाभला. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संकल्पक बापूजी साळूंखे. हे इतिहास संशोधक, गांधीवादी विचारसरणीचे स्वातंत्र्यसैनिक आणि सामान्य जनतेच्या शिक्षणासाठी कायम ध्येयवाद बाळगून असणारे एक तरुण व्यक्तिमत्व. अशा व्यक्तिमत्वाला कुटुंबामध्ये बांधून ठेवणे कदापीही शक्य नाही याची मनोमन जाणीव ठेवून संसार करणे म्हणजे एक विलक्षण काम होय. परंतु बापूजींच्या प्रत्येक कार्यामध्ये सुशीलादेवींनी म्हणजेच बाईंनी मोलाची साथ दिली. सुरुवातीचा संसार आनंदात झाला परंतु बापूजी सतत कार्यमग्न असल्यामुळे आणि ध्येयवादाने प्रेरित झाल्यामुळे संसाराचा सर्व गाढा चालविण्याचे काम बाईंनी यशस्वीपणे करून दाखविले.

कुटुंबातील सर्वच मुलांना सुसंस्कारित केले. सुशीलादेवी यांना सर्वजण आदराने बाई म्हणत असत. जीवन का जगायचे, कशासाठी जगायचे हा विचार बापूजींनी निश्चित केलेला होता. आपल्या जीवनात शालेय शिक्षण घेत असताना आलेले कष्ट कोणत्याही मुलाच्या नशिबी येऊ नये या विचारातून ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार हे ब्रीदवाक्य बापूजींनी निश्चित केले, आणि श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना बापूजींनी केली. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था स्थापन झाल्यानंतर सुरुवातीला वसतिगृहामध्ये स्वयंपाक करण्यासाठी स्वयंपाकी महिला गरजेच्या होत्या. पण पगार वीस रुपये द्यायचा कुठून, ही अडचण ओळखून बाईंनी स्वतः स्वयंपाक करणे निश्चित केले आणि वसतिगृहातील सर्व मुलांच्या त्या माता झाल्या. लौकिक अर्थाने केवळ बापूजींच्या मुलांची माता न राहता संस्थामाता झाल्या.

मातृदेवो भव। पितृदेवो भव। आचार्यदेवो भव। त्याप्रमाणेच दारिद्र्यदेवो भव। हे स्वामी विवेकानंदांचे विचार बापूजींनी आणि संस्थामाता सुशीलादेवी यांनी जीवनभर अंगीकारले. महात्मा गांधीजींचा प्रभाव बापूजींच्यावर होता. संस्थामाता सुशीलादेवी यांच्यावर होता. बापूजी गांधीवादी होते. पण गांधीवादाचे कर्मकांड बापूजींनी आणि संस्थामाता यांनी कधीही केले नाही. गोरगरिबांची सेवा करण्याचे व्रत दोघांनीही घेतले. साधी राहणी आणि उच्चविचार या गुणांचा अंगीकार या दाम्पत्याने आयुष्यभर सांभाळला. म्हणूनच महाराष्ट्रातील गोरगरिबांची मुले शाळेमध्ये प्रवेश घेऊ शकली आणि उच्चशिक्षित होऊ शकली. वसतिगृहातील मुलांना सुसंस्कार देण्याचे कार्य संस्थामाता सुशीलादेवी यांनी मातेच्या मायेने केले. वसतिगृहातील मुलांच्या कपडे शिलाईसाठी खर्च होऊ नये म्हणून बाईंनी स्वतः शिलाई कोर्स शिकुन घेतला आणि वसतिगृहातील मुलांचे गणवेश तयार केले. वसतिगृहामध्ये शिक्षण घेणारी मुले कधी आजारी पडत अशावेळी बाईनी स्वतः रात्रभर जागरण करून मुलांची सेवा केली. संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांनी आपले जीवन पूज्य बापूजींच्या ध्येयवादासाठी अखेरच्या श्वासापर्यंत समर्पित केले. त्यांच्या विचारांचा वारसा घेऊन शिक्षणाचे कार्य पवित्रपणे करणे हीच संस्थामाता सुशीलादेवी साळुखे यांना आदरांजली ठरेल.

❑ ❑ ❑

## त्यागमूर्ती सुशीलादेवी साळुंखे शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या अंत:करणात पोहोचावे – प्राचार्य अभयकुमार साळुंखे

### अभय रिसर्च अँड डेव्हलपमेंट सेंटर च्या शिक्षक पात्रता परीक्षेचे वर्गाचा ऑनलाईन उद्घाटन सोहळा

तासगाव– शिक्षकाकडे नाविण्याचा वेध घेण्याची क्षमता असावी. विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्राचा अभ्यास करून त्यांना सुसंस्कारी बनवावे आणि त्यांच्या अंतकरणापर्यंत पोहोचावे. असे उद्गार श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी अभय रिसर्च अँड डेव्हलपमेंट सेंटर च्या वतीने आयोजित केलेल्या शिक्षक पात्रता परीक्षेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना काढले. ते पुढे म्हणाले की, शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी ज्ञानाची विज्ञानाशी सांगड घालून सुसंस्कारी विद्यार्थी घडवले. आपणही तोच आदर्श पुढे चालवुया. प्रत्येक विद्यार्थ्याला चांगलं घडविण्यासाठी चांगल्या गुरूची गरज असते हे त्यांनी रामायण–महाभारतातील गुरुशिष्यांची उदाहरणे देऊन पटवून दिले.

या कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून लाभलेल्या स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे यांनी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, त्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व घडावं व गुणवत्ता वाढीस लागावी यासाठी योग्य मार्गदर्शन केले. प्रशासन सहसचिव प्राचार्य डॉक्टर राजेंद्र शेजवळ यांनी बापूजींच्या स्वप्नातील गुरुदेव कार्यकर्ता घडवण्यासाठी अभय रिसर्च अँड डेव्हलपमेंट सेंटर काम करत असल्याचा विश्वास व्यक्त केला.

या कार्यक्रमाचे नियोजन व प्रास्ताविक संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील यांनी केले तर आभार प्रा. महेंद्र निलजे यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कोरे यांनी केले. कार्यक्रमाला संस्थेतील सर्व डी.एड., बी.एड. महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षक पात्रता परीक्षेसाठी बसलेले विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## कुसुमाग्रज हे अहंकार, अनुभव व आविर्भाव ही कलेची आधारभूत तत्त्वे मानतात

प्रा. डॉ. एम. एस. उभाळे तासगाव

– कुसुमाग्रज यांनी असे सांगितले आहे की, अहंकार लेखकाच्या लेखन प्रवृत्तीला प्रेरणा आणि गती देतो. अनुभव मुळात निराकार व निरामय असतो तर आविर्भाव आशयाचा आकार म्हणजे घाट ठरवितो. कवितेमध्ये आलेली अश्लीलता, लैंगिकता व दुर्बोधता याचा कुसुमाग्रज यांनी विरोध केला. आणि कवितेमधील पावित्र्याला, सभ्यतेला त्यांनी महत्व दिले. असे प्रा. डॉ. एम. एस. उभाळे यांनी आपल्या उद्बोधन मार्गदर्शनात प्रशिक्षणार्थींना सांगितले.

तासगाव येथील संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयात वि. वा. शिरवाडकर यांच्या जयंतीनिमित्ताने मराठी राज भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील यांच्या हस्ते वि. वा. शिरवाडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करून व दिपप्रज्वलन करण्यात आले. यानंतर प्रशिक्षणार्थींनी कुसुमाग्रज यांच्या जीवनावर तयार केलेल्या भीती पत्रिकेचे अनावरण प्राचार्य डॉक्टर बी. एम. पाटील व उपस्थित प्राध्यापक यांनी केले.

त्यानंतर विद्यार्थिनींनी विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमाचे सादरीकरण केले. यात कवितावाचन, पोवाडा, लावणी नृत्य गीत गायनाचे सादरीकरण केले.प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. एम.एस.उभाळे यांनी कुसुमाग्रज यांच्या जीवनावर आधारित विविध प्रसंगांद्वारे उपस्थित विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

प्रा.सौ.प्रभा घोरपडे यांनी अध्यक्षीय समारोप केला. कु. सायली पाटील यांनी सूत्रसंचालन केले.तर आभार अभिव्यक्ती कु पुनम पोरे यांनी केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. लक्ष्मी भंडारे, प्रा. डॉ. अर्चना चिखलीकर, प्रा. डॉ.ए.टी. पाटील, यांनी प्रयत्न केले. तर श्री. एस. एस. महाडिक, श्री. एस. आर. कुंभार, श्री. वाघमारे व श्री. कोठावळे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.



## सं. सु. साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

तासगाव, दि. (प्रतिनिधी) : तासगाव येथील संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयात गुरुपौर्णिमा कार्यक्रमाचे ऑनलाइन सभेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रार्थना व दिपप्रज्वलन करण्यात आले प्राजक्ता जाधव यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाचा हेतू स्पष्ट केला त्याचप्रमाणे अक्षता बर्गे पूजा जाधव धनश्री कचरे व आनंद शिंदे या विद्यार्थिनींनी गुरुपौर्णिमेनिमित्त समायोचित मनोगते सादर केले. आजच्या शिक्षण पद्धतीवर आधारित विनोदी पद्धतीने धनश्री कुंभार यांनी भारुड सादर केले.



त्यानंतर प्रा. डॉ. एम. एस. उबाळे यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. त्यानंतर डॉक्टर गणेश गांधले आयुर्वेदाचार्य तासगाव यांनी आपले गुरु–शिष्य परंपरा या विषयावर मनोगत सादर केले. गुरु शिवाय कोणतेही ज्ञान, शिक्षण मिळत नाही. गुरु शिवाय शिष्याचे जीवन अपूर्ण असते. आयुर्वेदामध्ये सुद्धा फार मोठी गुरु–शिष्य परंपरा आहे. गुरु शिष्यांना आपल्याकडील सर्व ज्ञान अनुभव व कौशल्य देऊन त्यांच्या जगण्याच्या क्षमता निर्माण करतात. शिष्याने ही अगदी मुक्तपणे गुरूकडून हा ज्ञानाचा वसा घेऊन आपले जीवन सार्थक करावे, समृद्ध करावे अशा प्रकारचे विचार डॉक्टर गणेश गांधले यांनी आपल्या मनोगतातून सादर केले.

त्यानंतर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील यांनी अध्यक्षीय मनोगत सादर केले. प्राजक्ता जाधव यांनी आभार अभिव्यक्ती तर स्वप्नाली बचुटे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. डॉ. एम. एस. उभाळे, प्रा. डॉ. ए. टी. पाटील, प्रा. सौ. प्रभा घोरपडे, प्रा. डॉ. लक्ष्मी भंडारे व प्रा. डॉ. अर्चना चिखलीकर यांनी सहकार्य केले तर कार्यक्रमाच्या नियोजनासाठी श्री. एस. एस. महाडिक, श्री. एस. आर. कुंभार, श्री. शशिकांत कोठावळे व श्री. वाघमारे यांनी सहकार्य केले.

## कु. मयुरी शेंडगे हीचा राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत व्दितीय क्रमांक

तासगांव (प्रतिनिधी)– येथील संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील व्दितीय वर्षातील विद्यार्थिनी कु. मयुरी रविंद्रनाथ शेंउगे यांनी राज्यस्तरीय वक्तृत्व, निबंध स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले. यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स, कराड यांनी आयोजित केलेल्या 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत कुमारी मयुरीने महाविद्यालयामार्फत सहभाग घेतला होता. मा. यशवंतराव चव्हाण साहेबांचीसंरक्षण नीती' या विषयावर त्यांनी लिहिलेल्या निबंधाला २०० गुणांपैकी १६८ गुण मिळाले व व्दितीय क्रमांक मिळाला.

रोख ४००० रुपये, स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र असे पुरस्काराचे स्वरुप होते. यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील व डॉ. एम. एस. उबाळे यांचे तिला माग्रदर्शन मिळाले. तसेच प्रा. सौ. पी. एस. घोरपडे, प्रा. सौ. एल. व्ही. भंडारे, डॉ. ए. एस. चिखलीकर व ग्रंथपाल प्रा. ए. जी. पाटील यांचे सहकार्य मिळाले. महाविद्यालयाचे प्राचार्य व सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवक वर्ग यांनी कु. मयुरी शेंडगेचे अभिनंदन केले.

## स.सु.साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयात राज्यसेवा स्पर्धे संबंधी व्याख्यान

तासगाव : येथील संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयात ऑनलाइन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील विवेक वाहिनी व मार्गदर्शन आणि समुपदेशन विभागात तर्फे स्पर्धापरीक्षा आणि आपण या विषयावर चाणक्य मंडळ पुणे येथील प्रा. मयुर पाटील यांच्या व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता. सर्वप्रथम प्रार्थना व दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर वर्षा पाटील यांनी व्याख्यानाचा उद्देश प्रास्ताविकातून. त्यानंतर प्रा. डॉ. लक्ष्मी भंडारे यांनी प्रमुख वक्त्यांचा परिचय करून दिला. प्रा. मयुर पाटील यांनी आपल्या व्याख्यानातून उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. राज्य सेवा परीक्षेत यश मिळवणे अनेक विद्यार्थ्यांना कठीण वाटते परंतु असे नाही सामान्य विद्यार्थी सुद्धा यश हे संपादन करू शकतो त्यासाठी अभ्यासाचे योग्य नियोजन करायला हवे. आपल्यासमोर एक निश्चित उद्दिष्ट ठेवून अभ्यासामध्ये एकाग्रता, सातत्य आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवल्यास राज्यसेवा परीक्षेत यश मिळवता येते. तसेच सुरुवातीला अपयश आल्यास निराश न होता प्रयत्नांमध्ये सातत्य ठेवल्यास एमपीएससी परीक्षेत यश मिळवता येते असे त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे एमपीएससी, यूपीएससी मधील फरक स्पष्ट करून अभ्यास करण्याच्या सोप्या पद्धती सांगितल्या. त्यामध्ये रोजचे वर्तमानपत्र वाचून नोंदी ठेवणे, पाचवी ते दहावी पर्यंतचे सर्व पाठ्यपुस्तके सतत वाचणे, गेल्या तीन–चार वर्षातील परीक्षांचे पेपर सोडवणे, आपण कोणत्या वेळेला अभ्यास केला म्हणजे लक्षात राहते हे निश्चित करून अभ्यासाचा प्राईम टाईम करून अभ्यास करणे व नेहमी सकारात्मक राहणे अशा विविध मुद्द्यांवर त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. त्यानंतर स्पर्धा परीक्षेच्या संदर्भातील विद्यार्थिनींच्या प्रश्नांची समर्पक उत्तरे देऊन शंकांचे समाधान केले.



## स.सु.साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयात जागतिक लोकसंख्या दिन साजरा

तासगाव येथील संस्थामाता सुशीलादेवी साळुखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयात जागतिक लोकसंख्या दिन ऑनलाइन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थना व दीपप्रज्वलनाने झाली.त्यानंतर स्वप्नाली बचुटे यांनी कार्यक्रमाचा हेतू प्रास्ताविकातून स्पष्ट केला. श्वेता चौधरी, पूजा जाधव व अस्मा जमादार या प्रशिक्षणार्थीनींनी आपले मनोगते सादर केली, त्यानंतर प्रा,डॉ.एम.एस.उमाळे यांनी प्रमुख वक्त्यांचा परिचय करून दिला. प्रा.डॉ. कुल दीप पाटील (पी. व्ही. डी. टी. कॉलेज तासगाव) यांनी लोकसंख्या आणि कोव्हीड समस्या या विषयावर आपले प्र अभ्यासपूर्ण सादरीकरण केले. यात व त्यांनी लोकसंख्या दिन साजरा करण्याचे औचित्य, जागतिक



ष स्तरावरील लोक संख्यावाढ . भारतातील लोकसंख्यावाढ, त्या अनुषंगाने महिलांचे आरोग्य, लोकसंख्या वाढीचा आणि कोव्हीड

व यांचा संबंध अशा विविध मुद्यांवर । सविस्तर विवेचन केले. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य । डॉ.बी.एम.पाटील यांनी अध्यक्षीय मनोगत सादर केले. तेजश्री गुरव – यांनी आभार अभिव्यक्ती तर गौरी हंकारे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. एम. एस. उभाळे, प्रा. डॉ. ए. टी. पाटील, प्रा. सौ. प्रभा घोरपडे, प्रा.डॉ.लक्ष्मी भंडारे व प्रा.डॉ. अर्चना चिखलीकर यांनी प्रयत्न केले.तर श्री.एस. एसमहाडीक श्री.एस.आर.कुंभार,श्री,शशिकांत कोठावळे व श्री.वाघमारे यांनी सहकार्य केले.

## कु. प्राजक्ता पाटील हीचा विद्यापीठ गुणवत्ता यादीत नववा क्रमांक



संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थिनी कु. प्राजक्ता जगन्नाथ पाटील हिला विद्यापीठ गुणवत्ता यादीत नववा क्रमांक मिळाला आहे. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी मार्च २०१८ मध्ये घेतलेल्या बी.एड.परीक्षेत कु. प्राजक्ता पाटील यांना गुणवत्ता यादीत नववा क्रमांक मिळाल्याचे कळविण्यात आले आहे. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, ग्रंथपाल आणि प्रशासकीय सेवक यांनी बी.एड.च्या शिक्षक प्रशिक्षण काळात मोलाचे सहकार्य केले असे कु. प्राजक्ता पाटील यांनी सांगितले.

महाविद्यालयात त्यांचा प्रभारी प्राचार्य डॉ.बी.एम.पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यावेळी त्यांचे कुटुंबीय ही उपस्थित होते. त्यांच्या या यशाबद्दल डॉ.ए.जी.पाटील, डॉ. एम. एस.उभाळे.प्रा.सौ.प्रभा घोरपडे,डॉ. लक्ष्मी भंडारे,डॉ. अर्चना चिखलीकर, ग्रंथपाल प्रा. ए. जी. पाटील यांनी तसेच श्री.एस. एस. महाडिक, श्री. एस. आर. कुंभार, श्री. शशिकांत कोठावळे व श्रीएच.टी.वाघमारे यांनी अभिनंदन केले आहे.

## निरामय जीवनासाठी योगसाधनेत सातत्य असणे आवश्यक ! प्रा. डॉ. एम. एस. उभाळे

तासगाव : ज्याप्रमाणे आपल्या दैनंदिन जीवनामध्ये जेवण, स्नान, झोप आणि सर्व शरीराच्या क्रिया आवश्यक असतात. त्याचप्रमाणे योगसाधना हा आपल्या जीवनाचा अविभाज्य व नैसर्गिक सवयीचा भाग व्हायला हवा. ही एक जीवनपद्धती व्हायला हवी. त्यामुळे मानवाला निरामय व सुदृढ आरोग्य लाभेल. पूर्ण अष्टांग योगाचा दैनंदिन जीवनात वापर करणे सर्वांना शक्य नसले तरी यम, नियम, योगासने, प्राणायाम व ध्यान या पाच अंगांचा वापर सामान्य माणसाला करणे शक्य आहे ! असे विचार प्रा. डॉ. एम. एस. उभाळे यांनी आंतरराष्ट्रीय योग दिना निमित्त ऑनलाइन सभेत मांडले.



संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम प्रशिक्षणार्थींनी विद्यार्थिनी आयेशाबी डांगे यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर स्वागत सनम मुलांनी यांनी केले. त्यानंतर पूजा थोरात, मयूरी पुदाले व धनश्री पुदाले यांनी योगासंबंधी आपली मनोगते सादर केली.

त्यानंतर प्रा. डॉ. एम. एस. उभाळे यांनी योगा संबंधी आपले मनोगत सादर केले. प्रभारी प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील यांनी अध्यक्षीय मनोगत सादर केले. आभार अभिव्यक्ती राजनंदा शिंदे यांनी तर सूत्रसंचालन अश्विनी किणीकर यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. एम. एस. उभाळे, प्रा. डॉ. ए. टी. पाटील, प्रा. सौ. पी. एस. घोरपडे, प्रा. डॉ. एल. व्ही. भंडारे, प्रा. डॉ. ए. एस. चिखलीकर यांनी प्रयत्न केले. तर श्री. एस. एस. महाडिक, श्री. एस. आर. कुंभार, श्री. शशिकांत कोठावळे व श्री वाघमारे यांनी सहकार्य केले.

## उज्ज्वल भविष्यासाठी पर्यावरण संवर्धन गरजेचे : डॉ. डेळेकर


सततची वृक्षतोडी व प्रदूषणाचे संकट आपण आपल्या हाताने ओढवून घेत आहोत. उज्वल भविष्यासाठी पर्यावरण संवर्धन गरजेचे आहे. असे प्रतिपादन डॉ. सागर डेळेकर यांनी केले.




ते संस्थामाता सुशीलादेवी साळुखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयात जागतिक पर्यावरण दिनाच्या कार्यक्रमात बोलत होते. ते पुढे म्हणाले 'सेव वॉटर सेव एनर्जी' उज्वल भविष्यासाठी व आपल्या अस्तित्वासाठी पर्यावरण संवर्धन करणे किती गरजेचे आहे हे विविध उदाहरणे देऊन सांगितले. फुटबॉलच्या मैदाना एवढी दररोज वृक्षतोड होत असते, जैवविविधता टिकविण्यासाठी आपल्याला प्रयत्न करावे लागतील असे सांगून पर्यावरण क्षणाचा संकल्प करण्याचे आव्हान त्यांनी प्रशिक्षणार्थींना केले. अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील यांनी प्रशिक्षणार्थींना वृक्ष लागवड त्याचे जतन करण्याचे आवाहन केले. सूत्रसंचालन पूनम पोरे हिने केले. प्रास्ताविक ज्योत्स्ना पवार, स्वागत सायली पाटील व पाहुण्यांचा परिचय डॉ. अर्चना चिखलीकर यांनी केले. विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. गुळवणी मॅडम, विविध महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, प्रशिक्षणार्थी, प्राध्यापक सौ. पी. एस. घोरपडे, डॉ. ए. टी. पाटील, डॉ. सौ. एल. व्ही. भंडारे, डॉ. एम. एस. उभाळे ऑनलाईन हजर होते. पूनम शिंदे हिने आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

## महिलांनी स्वत:च्या आरोग्याकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे. डॉ. तनुजा ब्राह्मणकर

महिलांनी स्वतःच्या शारीरिक दुखण्याकडे लक्ष द्यावे. स्वतःवर प्रेम करावे. आपल्या आरोग्याची काळजी आपण स्वतः घ्यायची आहे. मनात कोणताही न्यूनगंड ठेवू नये. नेहमी सकारात्मक रहावे. कोणताही आजार अंगावर काढू नये. त्यामुळे तो आजार वाढतो व दुसऱ्या आजारांना आमंत्रण देतो. तसेच रोज किमान अर्धा तास व्यायाम अवश्य करावा. जो व्यायाम करतांना तुम्हाला आनंद होतो तो जरूर करावा. किमान रायला जाणे, योगासने, प्राणायाम जरूर करावे. आपल्या आहाराकडे चांगले लक्ष द्यावे, समतोल आहार घ्यावा. अशा प्रकारचे विचार महिलांचे आरोग्य व प्रतिबंधात्मक उपाय या विषयावर डॉ. तनुजा ब्राहाणकर यांनी सादर केले. येथील संस्थामाता सुशीलादेवी साळुखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयात डॉक्टर्स डे निमित्ताने ऑनलाइन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात सर्वप्रथम प्रार्थना व दीपप्रज्वलन करुन उपस्थितांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर आयेशाबी डांगे यांनी प्रास्ताविक केले. शैला जतकर, गौरी हंकारे व पूजा जाधव या विद्यार्थिनींनी डॉक्टर हे निमित्ताने आपल्या विचारांचे सादरीकरण केले. त्यानंतर प्राध्यापक प्रा.डॉ. चिखलीकर यांनी प्रमुख वक्त्या डॉ. तनुजा ब्राहाणकर यांचा परिचय करून दिला. त्यानंतर डॉ. तनुजा ब्राह्मणकर यांनी महिला आरोग्य व प्रतिबंधात्मक उपाययोजना या विषयावरील मनोगत सादर केले. यात त्यांनी अन्तुकाळ, प्रजनन पूर्व अवस्था, प्रजनन अवस्था, प्रसूती काळ, रजोनिवृत्ती अशा विविध महिलांच्या आरोग्यविषयक प्रतिबंधात्मक उपचाराची सोप्या शब्दात व सखोल माहिती दिली.




यानंतर प्रभारी प्राचार्य डॉ. बी.एम. पाटील यांनी अध्यक्षीय मनोगत सादर केले. आभार अभिव्यक्ति तेजश्री गुरव यांनी तर सूत्रसंचालन निशा शिंदे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. एम. एस. उभाळे, प्रा. डॉ.ए.टी. पाटील, प्रा. डॉ.लक्ष्मी भंडारे. प्रा.पी.एस.घोरपडे, प्रा. डॉ.अर्चना चिखलीकर यांनी सहकार्य केले.तर एस.एस. महाडिक, एस. आर. कुंभार, शशिकांत कोठावदे व श्री. वाघमारे यांनी परिश्रम घेतले.

## स.सु.साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयात माहिती अधिकार दिन साजरा

संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती व माहिती अधिकार कायदा दिन असे तीन कार्यक्रम ऑनलाइन साजरे करण्यात आले.



सर्वप्रथम प्रार्थना व दीप प्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर प्रियंका कुंडलिक पाटील यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाचा उद्देश व रूपरेषा स्पष्ट केली. त्यानंतर मयूरी पुदाले,शीतल राजाराम पाटील,अश्विनी किणीकर,राजनंदा शिंदे व सलोनी पाटील यांनी महात्मा फुले, लालबहादूर शास्त्री व माहिती अधिकार कायदा या विषयी मनोगते सादर केली.

त्यानंतर प्रा.डॉ.एम.एस.उभाळे यांनी प्रमुख वक्ते श्री.मिलिंद सुतार यांचा परिचय करून दिला. त्यांनी आपल्या मनोगतातून सांगितले की,माहिती अधिकार कायद्यामुळे कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणात असलेली माहिती उपलब्ध होऊ शकते.कोणीही नागरिक प्रादेशिक भाषेमध्ये निर्धारित शुल्क भरून लिखित किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमाने अर्ज करून माहिती देण्याची विनंती करू शकतो.अशाप्रकारे माहिती प्राप्त करून भ्रष्टाचार थांबवता येऊ शकतो. माहिती अधिकार कायदा सर्वांसाठी उपयुक्त असा कायदा आहे.

त्यानंतर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.बी.एम.पाटील यांनी आपले मनोगत सादर केले. आभार अभिव्यक्ती शितल संजय पाटील यांनी तर सूत्रसंचालन सलोनी पाटील यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. एम. एस. उभाळे,प्रा. डॉ. ए. टी. पाटील, प्रा. सौ. प्रभा घोरपडे, प्रा.डॉ.लक्ष्मी भंडारे व प्रा.डॉ. अर्चना चिखलीकर यांनी सहकार्य केले. तर श्री.एस.एस.महाडिक श्री. एस. आर. कुंभार, श्री.शशिकांत कोठावळे व श्री.एच.टी. वाघमारे यांनी परिश्रम घेतले.